

# लोकमान्य टिळक यांना विनम्र श्रद्धांजली

**गीतेतली बरीच रहस्ये आता नव्याने उलगडू लागली आहेत. कौरव-पांडव उगीच राज्यासाठी लढत बसत नाहीत, तर युती करुन सत्ता भोगतात... 'आप्त स्वकीयांशी कसा लढू' हा प्रश्न पडत नाही कुठल्याच अर्जुनाला. बाप, भाऊ, मामा, काका, गुरू-कुणाच्याही पाठीत सहज खंजीर खुपसतो आजचा अर्जुन.**

एक ऑगस्टला आम्ही तुमचे पुण्यस्मरण केले टिळक महाराज! ती शेंगांच्या टरफलांची गोष्ट पुन्हा आठवली. सध्या लोक काहीही खातात आणि शेंगा खाल्ल्यावर टरफले इथे तिथे नाही टाकत, तर ती ही खाउनच टाकतात. शेंगा खाल्ल्याचा कुठलाच पुरावा ठेवत नाहीत मागे. संत शब्द तुम्ही तीन प्रकारे लिहिलात! आता संत शब्द कुठल्याच प्रकारे लिहावा लागत नाही फारसा. संत व्हायचा प्रयत्न तर कुणीच करत नाही, कुणालाच तेवढी उसंत नसते. स्वातंत्र्यासाठी तुम्ही तुरुंगवास भोगलात टिळक महाराज... स्वतंत्र भारतात आता तुरुंगवास 'उपभोगता' येतो.

मंडालेहून निघालेला स्वातंत्र्याचा 'रोड' आता 'आर्थर रोड' पाशी येऊन थांबलाय. तिथं देशद्रोह्यांना मिळणार्या सुखसोयींचा हेवा बाहेरच्या देशप्रेमी, कायदापालक सज्जनांनाही वाटू लागलाय. तुम्ही लिहिलंत गीतारहस्य. गीतेतली बरीच रहस्ये आता नव्याने उलगडू लागली आहेत. कौरव-पांडव उगीच राज्यासाठी लढत बसत नाहीत, तर युती करुन सत्ता भोगतात... 'आप्त स्वकीयांशी कसा लढू' हा प्रश्न पडत नाही कुठल्याच अर्जुनाला. बाप, भाऊ, मामा, काका, गुरू-कुणाच्याही पाठीत सहज खंजीर खुपसतो आजचा अर्जुन. वस्त्रहरण तर नित्याचंच झालं आहे पण कृष्णानं पाठवलेली वस्त्रं कधीच पोचत नाहीत, कुठल्याच द्रौपदीपर्यंत... टिळक, आता 'केसरी' शब्दाचा अर्थही कळत नाही कुणाला. डरकाळ्या फोडणार्या कुठल्याच सिंहाचा आता भरवसा उरला नाही.. सांगता येत नाही कधी कुणाच्या ताटाखालचे मांजर बनून जातील... चिंतन, मनन आणि हवापालट करायला तुम्ही सिंहगडावर जाऊन रहायचात ना टिळक? तिथली हवासुद्धा आता खूप पालटली आहे. गडाच्या पायथ्याशी आता रेव्ह पार्ट्या चालतात सिंह तर तेव्हाच गेला, गड राखणंही आता कठीण झालं आहे. तुम्ही सार्वजनिक केलेला गणपती उत्सव खूप लोकप्रिय होतो आहे दिवसेंदिवस. प्रत्येक गल्लीचे, बोळाचे स्वतंत्र गणपती झालेत... आता गणपती बुडवायला समुद्रही अपुरे पडणार बहुतेक... 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' असा प्रश्न तुम्ही केला होतात. आता सरकारचे डोकेच काय, सरकारच ठिकाणावर नसते. सरकार अस्थिर ठेवण्याचे फायदे कळून चुकलेत सगळ्यांना. आठवडी बाजारासारखा घोडेबाजार भरलेला असतो तेजीत. इंग्रजांना हाकलल्यानंतर आम्ही मुलांना आता इंग्रजी शाळेत घातले आहे. त्यांना विलायतेला धाडायची खूप धडपड चालली आहे आमची. एकदा ती विलायतेला गेली की भारत देश, मराठी भाषा, मराठी आई-बाप सारंच परकं होईल त्यांना. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची तशी त्यांना फारशी माहितीही नाही.. मग कुठले टिळक, कुठला एक ऑगस्ट आणि कुठलं काय...एक ऑगस्टला तुमचं पुण्यस्मरण करणारी ही आमची शेवटचीच पिढी बहुतेक. टिळक, पुन्हा एकदा तुम्हाला विनम्र श्रद्धांजली!



# किमया सोन्याची

**हे असे असूनसुद्धा जो पर्यंत दागिने घालून मिरविण्याची स्त्रियांची हौस आहे, तो पर्यंत ते असेच चालू रहाणार व विकणारा त्याचा पुरेपूर फायदा उठविणार या बद्दल त्याला दोष देण्यात तरी काय अर्थ आहे ? हीच तर आहे 100 नंबरी सोन्याची किमया.**

सोने म्हणजे बायकांचा जीव की प्राण ! अशा या सोन्याचा हव्यास विशेषतः आपल्या देशातील स्त्रियांमधे अधिकच आहे. सोन्याचे दागिने घालून लग्ना-कार्यात मिरविण्याचे सुख काय असते, हे स्त्रियाच जाणोत! परंतु प्रत्येकाच्या नाशिबात हे सुख सारखे असतेच असे नाही. असे असले तरीही आपल्या कुटुंबाच्या ऐपती प्रमाणे काही ठिकाणी काटकसर करून, थोडी तरी किडुक-मिडुक दागिने करण्याची ही हौस, पुर्वीच्या काळापासून आजतागायत चालूच आहे. अशा या सोन्याचा भाव 10 ग्रामला 25 हजाराच्या वर पोहोचला आहे व तो सारखा वाढतच रहाणार आहे. अशा या सोन्याची किमया आहे तरी काय? या विषयी थोडेसे :-

काही वर्षा पूर्वी हॉलिवूडचां प्रथितयश कलाकार ग्रेगरी पेक याच्या अप्रतिम अभिनयाने नटलेळा-'मॅकेनीज-गोल्ड' हा सिनेमा प्रदर्शित झाला होता. त्यात डोंगर पठारातीळ ओसाड अशा प्रदेशात सोन्याच्या खाणी शोधण्यासाठी हपापलेले लोकं अन्नपाण्याची पर्वा न करता-घोडदौड करीत, एकमेकात चुरस लागून सोन्याच्या हव्यासा पायी आपला आत्मनाश कसा करून घेतात, त्याचे विदारक चित्र दाखविले होते. असा हा लाख मोलाचा जीव धोक्यात घालून धाडस करण्या एवढे हे सोने ही चीज आहे तरी काय? याचे कोडे हळू-हळू उलगडत गेले. कारण अशा सोन्यापायी हजारो वर्षापासून देशो देशातील लढायात किती तरी जणांनी आपले प्राण गमावले असतील! असे असले तरीही या सोन्याचा हव्यास असण्याचे वेड आजच्या काळातही चालू आहे. अशा या सोन्याचा इतिहास आपण पहावयास गेलो तर तो अति मनोरंजक ठरेल:-भूगर्भशास्त्राच्या संशोधना वरून असे निष्पन्न झाले आहे की सोने हे प्रथमतः मीडल ईस्ट इजिप्तमधील सुमेरिया मधील मृत व्यक्तिचे जे ममीज ठेवले गेले, त्यांच्या अंगावर सोन्याने मढविलेले दागिने चढवून त्यांचे दफन केले जात असे. असेच एक 'लुतानखामेज' ममीचे जेव्हा उत्खनन केले गेले, तेव्हा त्यामधे दागिन्यानी मढविलेली ममी खोद काम करणाऱ्यांच्या पहाण्यात आली. तेव्हा इजिप्तमधील कारागिर सोन्याचे दागिने बनविण्यात अग्रेसर असावे असाच इतिहास सांगतो. त्यानंतर सुधारीत असा प्रसार, अरबांनी केला. तसेच रोम जेव्हा उत्कर्षायत होत गेले तेव्हा रोम शहरातील कारागिरांनी घरात वापरण्यासाठी तसेच फर्निचरच्या आकर्षक डिजाईनसाठी सोन्याच्या कलाकुसरीचा वापर केला. अशा प्रकारे सोन्याचा प्रसार होता. जसा तिथे ख्रिश्चन समाजाचा जम बसत गेला तेव्हा त्या देशातही सोन्याचे आकर्षण वाढत गेले. तरी अशा किमती धातूचे उत्पादन अल्प प्रमाणात असल्यामुळे, त्याची जास्तीत जास्त साठवण करावी, तसेच ज्या-ज्या देशातील खाणीत त्याची उपलब्धता आहे, तेथे आपण प्रथम जाऊन त्याचा कब्जा करावा! अशा विविध कारणास्तव कितीतरी लोकांना आपले प्राण गमवावे लागले अशी मुख्य मनुष्य हानी कैलिफोर्नियात 1848 साली, ऑस्ट्रेलियाचा फेमस गोल्ड 1851 साली तर आफ्रिकेत 1884 साली आणि कॅनडात 1897 साली झाली. पुढे आंतरदेशीय आर्थिक परिस्थिती चे विश्लेषण, त्या देशाच्या सोन्याच्या साठवणी वर अवलंबून रहावे या उद्देशाने ग्रेट ब्रिटनमधे 1870 साली गोल्ड स्टैंडर्डचा कायदा अस्तित्वात आळा, त्यानंतर तो सर्व युरोपभर अमलात आणला गेला. प्रत्येक दुकानात पहाल तर तेथे गिऱ्हाई काना उभे रहाण्यास जागा नसते, एवढी गर्दी तेथे पहावयास मिळते. सदर दुकानदारानी केलेले लाखो रुपयाचे इंटिरीअर डेकोरेशन व झगमगते दिवे याचा सर्व खर्च ते गिऱ्हाईकाच्या खिशातूनच तर घेणार. हे असे असूनसुद्धा जो पर्यंत दागिने घालून मिरविण्याची स्त्रियांची हौस आहे, तो पर्यंत ते असेच चालू रहाणार व विकणारा त्याचा पुरेपूर फायदा उठविणार या बद्दल त्याला दोष देण्यात तरी काय अर्थ आहे? हीच तर आहे 100 नंबरी सोन्याची किमया.

✍ नाना परळकर
प्रसिद्ध लेखक, वर्सोवा लिंक रोड, अंधेरी, मुंबई